पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १६०**

**सभावृत्तांत**

दिनांक – १०/०३/२०१५ वेळ – सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार,दिनांक १०/०३/२०१५ रोजी सकाळी १०.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती
२) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
३) मा.गायकवाड संध्या सुरदास
४) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५) मा.तरस बाळासाहेब जयवंत
६) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
७) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
८) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
९) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
१०) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
११) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
१२) मा.काळे विमल रमेश
१३) मा.अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार
१४) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना,मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील,मा.चव्हाण,मा.तुपे-सहशहर अभियंता,मा.गायकवाड,मा.खांडकेकर,मा.दंडवते,मा.फुंदे-सहा.आयुक्त, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.सातव-प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक), मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.दुधेकर,मा.निकम,मा.सवणे,मा.इंगळे,मा.चव्हाण,मा.कपिले,मा.थोरात,मा.साळवी, मा.कुलकर्णी,मा.खाबडे, मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.घोडे, मा.केदारी, मा.गट्टूवार, मा.शेख, मा.कांबळे, मा.ओंभासे -कार्यकारी अभियंता, मा.अष्टीकर-सह.व्यवस्थापकीय संचालक पीएमपीएमएल, मा.लावंड-कायदा अधिकारी, मा.पाटील, मा.लोणकर,मा.दांगट,मा.बोदडे-प्र.अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

अ) दिनांक १६/०२/२०१५ व १८/०२/२०१५ रोजी (दु.१.४५ व ३.५० वा.) झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१५५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक २७/०२/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१५७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले -</u>**

विषय क्रमांक १५)- सुरक्षा विभागाकरिता पुरविणेत आलेल्या वॉकी-टॉकी संचाची परवाना नुतनीकरणाची फी अदा करणेबाबत...

विषय क्रमांक १६)- स्वाईन फल्यू आजारासाठी आवश्यक असणारे औषधे सिरप टॅमीफल्यू याची तातडीक खरेदी करणेबाबत...

विषय क्रमांक १७)- पी.एम.पी.एम.एल. यांना विविध प्रकारच्या पासेसपोटी आगावू स्वरुपात अग्रीम रक्कम अदा करणेबाबत...

विषय क्रमांक १८)- सुरक्षारक्षकांना निवासस्थान देणेबाबत – मा.धनंजय आल्हाट, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक १९)- क्रांतीसूर्य महात्मा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सवाच्या आयोजनास व खर्चास मान्यतेबाबत-मा.विनायक गायकवाड, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २०)- शहराचे सांस्कृतिक व कला धोरण तयार करणेबाबत - मा.संध्या गायकवाड व मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव...

--------

ठराव क्रमांक – १०९९३ विषय क्रमांक – १
दिनांक – १०/०३/२०१५ विभाग – पाणीपुरवठा
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड
संदर्भः- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१८७३/१५ दि.२७/२/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.२/८७/२०१४-१५ मधील अ.क्र.७ अन्वये, मनपाच्या अ प्रभागातील शुद्ध पाणी पुरवठा पंपिंग स्टेशन मधील पंपिंग मशिनरीची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणेकामी मे.एक्सेल इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू.२३,३४,१५१/- (अक्षरी र.रू. तेवीस लाख चौतीस हजार एकशे एकावन्न फक्त) पेक्षा ९.५० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२२,१८,०२६/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०९९४ विषय क्रमांक – २

दिनांक – १०/०३/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक –मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१८७४/१५ दि.२७/२/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.२/८७/२०१४-१५ मधील अ.क्र.१४ अन्वये, मनपाच्या क प्रभागातील शुद्ध पाणीपुरवठा पंपिंग स्टेशन मधील पंपिंग मशिनरीची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणेकामी मे.एक्सेल इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू. २३,३४,०४०/- (अक्षरी र.रू. तेवीस लाख चौतीस हजार चाळीस फक्त) पेक्षा ९.५०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२२,१७,९२१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०९९५ विषय क्रमांक – ३

दिनांक – १०/०३/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक –मा.बाळासाहेब तरस अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१८७५/१५ दि.२७/२/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.२/८७/२०१४-१५. मधील अ.क्र.६० अन्वये, अशुद्ध जल उपसा केंद्र रावेत येथील पंपगृहातील टप्पा १ ते ४ डिलीव्हरी लाइन वरील व्हाल्व्ह अॅक्च्युएटर्सची वार्षिक पद्धतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.एक्सेल इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू.१८,२९,३०७/- (अक्षरी र.रू. अठरा लाख एकोणतीस हजार तीनशे सात फक्त) पेक्षा १.६०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.१८,९०,०३९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०९९६ विषय क्रमांक – ४

दिनांक – १०/०३/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक –मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२३८/१५ दि.२७/२/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/८८-२०१४-१५ मधील अ.क्र.७४ अन्वये, प्रभाग क्र.२९ मधील झोपडपट्टीतील अंतर्गत रस्ते हॉटमीक्स पध्दतीने डांबरीकरण करणे इतर अनुषांगिक कामे करणेकामी मे.व्हि.एम.मातेरे इन्फ्रास्ट्रक्चर (इं) प्रा.लि. (नि.र.रु.१६,८०,१२०/- (अक्षरी र.रु.सोळा लाख ऐंशी हजार एकशे वीस) पेक्षा ३.१०% कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१६,२८,०३६/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – १०९९७ विषय क्रमांक – ५
दिनांक – १०/०३/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक –मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२४१/१५ दि.२७/२/२०१५
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/८८-२०१४-१५ मधील अ.क्र.५३ अन्वये, प्रभाग क्र.६२ मधील झोपडपट्टयातील अंतर्गत रस्ते हॉटमीक्स पध्दतीने डांबरीकरण करणे इतर अनुषांगिक कामे करणेकामी मे.व्हि.एम.मातेरे इन्फ्रास्ट्रक्चर (इं) प्रा.लि. (नि.र.रु.१४,९३,९००/- (अक्षरी र.रु.चौदा लाख त्र्यान्नव्व हजार नऊशे) पेक्षा ३.१० % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१४,४७,५८९/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०९९८ विषय क्रमांक – ६
दिनांक – १०/०३/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२४०/१५ दि.२७/२/२०१५
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/८८-२०१४-१५ मधील अ.क्र.८४ अन्वये, प्रभाग क्र.३७ मधील झोपडपट्टीमधील अंतर्गत रस्ते हॉटमीक्स पध्दतीने डांबरीकरण करणे इतर अनुषांगिक कामे करणेकामी मे.क्लीन्सी कन्स्ट्र.प्रा.लि. (नि.र.रु.१४,९३,९००/- (अक्षरी र.रु.चौदा लाख त्र्याण्णव हजार नऊशे) पेक्षा ३.२०% कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१४,४६,०९५/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०९९९ विषय क्रमांक – ७
दिनांक – १०/०३/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक –मा.संपत पवार अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२३९/१५ दि.२७/२/२०१५
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/८८-२०१४-१५ मधील अ.क्र.८७ अन्वये, ब प्रभागातील झोपडपट्टया मधील रस्त्याचे डांबरीकरण करणे व इतर अनुषांगिक कामे करणेकामी मे.क्लीन्सी कन्स्ट्र.प्रा.लि. (नि.र.रु.१४,९३,९००/- (अक्षरी र.रु. चौदा लाख त्र्याण्णव हजार नऊशे) पेक्षा ३.२० % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१४,४६,०९५/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११००० विषय क्रमांक – ८

दिनांक – १०/०३/२०१५ विभाग – वैद्यकीय मुख्य कार्यालय

सुचक –मा.धनंजय आल्हाट अनुमोदक –मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/१अ/कावि/१८०/१५ दि.२/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

डॉ.प्रियदर्शनी केतन वर्तक, स्त्रीरोगतज्ञ यांना मानसेवी स्त्रीरोगतज्ञ पदावर व डॉ.पकंज जिन्दाल, आर्थोपेडीक सर्जन यांना मानसेवी आर्थोपेडीक सर्जनपदावर, डॉ.महेंद्र बेंजामिन चित्रे, न्युरो सर्जन यांना मानसेवी न्युरो सर्जन पदावर, डॉ.अनिल यशवंत परांजपे, नेत्ररोग तज्ञ यांना मानसेवी नेत्ररोग तज्ञ पदावर वाय.सी.एम. रूग्णालयात आदेशाच्या दिनांकापासुन ६ महीने कालावधीसाठी प्रतिमहा र.रु.१,०००/- एकत्रित मानधनावर नेमणुक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११००१ विषय क्रमांक – ९

दिनांक – १०/०३/२०१५ विभाग – स्थापत्य EWS प्रकल्प

सुचक –मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/EWSप्र/७६/१५ दि.३/३/१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

चिखली से.क्र.१७ व १९ मध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरकुल योजना राबविणे या प्रकल्पासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडून मिळालेले Consent to Operate चे नूतनीकरण करणेसाठीची फी र.रु.२,७७,३३०/- व फॉर्म फी र.रु.१००/- धनादेशाव्दारे त्यांचेकडे जमा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११००२ विषय क्रमांक – १०

दिनांक – १०/०३/२०१५ विभाग – फ क्षेत्रिय कार्यालय,स्थापत्य

सुचक –मा.धनंजय आल्हाट अनुमोदक –मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.फक्षे/कावि/२३०/१५ दि.५/९/१४

विषय - मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालयाच्या परिसरात ठिकठिकाणी वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे आणि पोयटा माती भरणे या कामाबाबत...

विषय क्रमांक १०चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११००३ विषय क्रमांक – ११

दिनांक – १०/०३/२०१५ विभाग – कामगार कल्याण

सुचक –मा.बाळासाहेब तरस अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.काक/१/कावि/१०३/१५ दि.४/३/१५

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ना.उच्च न्यायालय मुंबई येथे मनपा विरुध्द महापालिका परिवहन कामगार आघाडी आणि इतर हे रिट पिटीशन दाखल केलेले आहे त्यासाठी अनुभवी तज्ञ ॲड.किरण बापट यांना र.रु.७५,०००/- व ॲड.जी.एच केळुस्कर यांना र.रु.१३,०००/- + र.रु.३,०००/- एकुण र.रु.१६,०००/- इतकी वकील फी अदा केलेने झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ११००४ विषय क्रमांक – १२

दिनांक – १०/०३/२०१५ विभाग-यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

सुचक –मा.संपत पवार अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी-१/कावि/२३९/१५ दि.४/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामधील मानधन स्टाफनर्स यांना प्रस्तावातील प्रपत्र अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सुधारीत एकत्रीत मानधन (अनुभवाप्रमाणे) देणेस मान्यता देणेत येत आहे.

**प्रपत्र-अ**

| अ.क्र. | पदनाम | अनुभव | | |
|---|---|---|---|---|
| | | ० ते ३ वर्षापेक्षा कमी | ३ ते ५ वर्ष | ५ वर्षापुढील |
| १ | स्टाफनर्स | १६,०००/- | १८,०००/- | २०,०००/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११००५ विषय क्रमांक – १३

दिनांक – १०/०३/२०१५ विभाग-यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

सुचक –मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/६८/१५ दि.२६/२/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या ओटी विभागातील उपकरण दुरुस्तीकामी आवश्यक स्पेअर पार्ट – बल्ब (Hanalux कंपनीचे) खरेदी करणेकामी कोटेशन नोटीस क्र. २२/२०१४-१५ अन्वये मे.बालाजी ट्रेडर्स, नेहरुनगर, पिंपरी यांचे दर र.रु.६,०००/- प्रती नग लघुत्तम प्राप्त झाले असुन स्विकृत करणेत आले आहेत. मे.बालाजी ट्रेडर्स, नेहरुनगर, पिंपरी यांचेकडून ओटी विभागासाठी आवश्यक साहित्य बल्ब (Hanalux कंपनीचे) दर र.रु.६,०००/- प्रती नग प्रमाणे १२ नग बल्ब करारनामा करुन खरेदी करणेस व सदर खरेदीस होणारा खर्च र.रु.७२,०००/- (अक्षरी र.रू.बहात्तर हजार) ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११००६ विषय क्रमांक – १४

दिनांक – १०/०३/२०१५ विभाग-यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/६९/१५ दि.२६/२/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या ओटी विभागातील उपकरण दुरुस्तीकामी आवश्यक स्पेअर पार्ट – बल्ब (Japan कंपनीचे) खरेदी करणेकामी कोटेशन नोटीस क्र. २३/२०१४-१५ अन्वये मे.बालाजी ट्रेडर्स, नेहरुनगर, पिंपरी यांचे दर र.रु.६,०००/- प्रती नग लघुत्तम प्राप्त झाले असुन स्विकृत करणेत आले आहेत. मे.बालाजी ट्रेडर्स, नेहरुनगर, पिंपरी यांचेकडून ओटी विभागासाठी आवश्यक साहित्य बल्ब (Japan कंपनीचे) दर र.रु.६,०००/- प्रती नग प्रमाणे १२ नग बल्ब करारनामा करुन खरेदी करणेस व सदर खरेदीस होणारा खर्च र.रु.७२,०००/- (अक्षरी र.रू.बहात्तर हजार) ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले –</u>

ठराव क्रमांक – ११००७ विषय क्रमांक – १५
दिनांक – १०/०३/२०१५ विभाग-दूरसंचार
सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.दूरसंचार/३/कावि/२४/१५ दि.९/३/२०१५

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सुरक्षा विभागाकरिता पुरविणेत आलेल्या एकूण ६८ नग वॉकीटॉकी संचाचे परवाना नुतनीकरण व रॉयल्टीची एकत्रित फी र.रु.७१,०००/- भारत सरकारचे संचार मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयास डी.डी. ने अदा करणेसाठी व यापुढे दरवर्षी सदर परवाना नुतनीकरण व रॉयल्टीच्या फी पोटी येणा-या प्रत्यक्ष फीची रक्कम भारत सरकारचे संचार मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयास डी.डी. ने अदा करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११००८ विषय क्रमांक – १६
दिनांक – १०/०३/२०१५ विभाग-वैद्यकीय मुख्य कार्यालय
सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मऔभां/१/कावि/५२/१५ दि.५/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाकडील नोंदणीकृत निविदाधारक मे.शशी एंटरप्रायजेस चिंचवड यांचेकडुन आवश्यकतेनुसार Syp Tamiflu 75 ml र.रु.४५४/- प्रती बॉटल या दराने ५०० बॉटल्स थेट पद्धतीने खरेदी करणेस व येणा-या र.रु.२,२७,०००/-चे खर्चास मान्यता देणे व यापुढे या दराने ही औषधे आवश्यकतेनुसार वेळोवेळी खरेदी करणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११००९ विषय क्रमांक – १७
दिनांक – १०/०३/२०१५ विभाग-लेखा
सुचक – मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/१४०/१५ दि.५/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पीएमपीएमएल यांना शासन निर्णय क्र.एनयुआर२०१३ प्रक३३८/नवी३३ दि.१८/२/२०१४ व मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे उक्त पत्रानुसार सन २०१३-१४ मध्ये येणा-या संभाव्य संचलन तुटी (operational losses) पोटी उर्वरीत र.रु.९२,८९२/- (अक्षरी र.रु.ब्याण्णव हजार आठशे ब्याण्णव) फक्त अदा करता येईल व विविध प्रकारच्या पासेसपेटी आगावू स्वरुपात र.रु.७,५०,००,०००/- कोटी अग्रीम स्वरुपात दिलेल्या रकमेचे समायोजन करण्याच्या अटीस अधीन पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.पुणे यांना असे एकुण र.रु.७,५०,९२,८९२/- फक्त (अक्षरी र.रु. सात कोटी पन्नास लाख ब्याण्णव हजार आठशे ब्याण्णव फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११०१०                                    विषय क्रमांक – १८
दिनांक – १०/०३/२०१५
सुचक – मा.धनंजय आल्हाट                                   अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस
संदर्भ:- मा.धनंजय आल्हाट व मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मिळकतींवरील रिक्त निवासस्थानांवर ठेकेदारांकडील सुरक्षा रक्षकांपैकी निवासी रहाण्यास इच्छुक असलेल्या सुरक्षा रक्षकास त्यांची कायदेशीर प्रक्रिया पडताळून ११ महिनेचे कालावधीसाठी त्यांचेकडून र.रु.१००/- चे बॉन्ड पेपर लिहून घेऊन नियुक्ती केलेस मनपाच्या ब-याच मिळकतींना सुरक्षा उपलब्ध होऊ शकेल तसेच अस्थापनेवरील कर्मचा-यांच्या नियुक्तीच्या तुलनेत आर्थिकदृष्टया लाभदायक ठरेल. तसेच वरीलप्रमाणे मनपाचे मिळकतींवरील रिक्त निवासस्थानांवर ठेकेदारी सुरक्षा रक्षकांची नेमणूक केलेस तीन सुरक्षा रक्षकांऐवजी एकाच सुरक्षा रक्षकामार्फत मिळकतींची सुरक्षा होईल व पुष्कळ मिळकतींवर सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन देणे शक्य होईल. तसेच सदर सुरक्षारक्षक हे मनपाच्या मिळकतींचे २४ तास संरक्षण करणार असलेने त्यांना निवासस्थानास वापर होणारे वीज,पाणी व निवासस्थानाचे घरभाडे माफ करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११०११                                    विषय क्रमांक – १९
दिनांक – १०/०३/२०१५
सुचक – मा.विनायक गायकवाड                                अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा.विनायक गायकवाड व मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने दिनांक ११ ते १४ एप्रिल २०१५ दरम्यान प्रतिवर्षी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव साजरा करण्यात येतो. या वर्षीही दिनांक ११ ते १४ एप्रिल २०१५ दरम्यान परिसंवाद, व्याख्यानमाला, सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११०१२                                    विषय क्रमांक – २०
दिनांक – १०/०३/२०१५
सुचक – मा.संध्या गायकवाड                                 अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस
संदर्भ:- मा.संध्या गायकवाड व मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहराचे सांस्कृतिक व कला धोरण तयार करणेत आले आहे. सदर धोरणास मा.महापालिका सभेने ठराव क्र. ४२३ दि.१८/०१/२०१४ अन्वये मान्यता दिलेली आहे. सांस्कृतिक आणि कला धोरणांतर्गत वेळोवेळी आयोजित करणेत येणा-या कार्यक्रमांतर्गत विविध प्रकारची कामे करणेसाठी निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पद्धतीने सांस्कृतिक आणि कला

धोरणाची कामे तरतूदीचे मर्यादेत राहून करणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/३५/२०१५
दिनांक - १३/३/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.